**<u>ठळक बातम्या</u>**

- उपहारगृह, हॉटेलांना सोमवारपासून अतिरीक्त एलपीजी द्यायला केंद्र सरकारची परवानगी, मात्र पाइप गॅस जोडणीसाठी नोंदणी आवश्यक

- विद्यापीठांमधे आधुनिक आणि वैज्ञानिक दृष्टीकोन असणाऱ्या अभ्यासक्रमाची गरज उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडून व्यक्त

- अशोक खरातची पोलिसांकडून कसून चौकशी, सर्वच भोंदू बाबा आणि त्यांच्याशी संबंधित राजकीय नेत्यांवर कारवाई करण्याची उद्धव ठाकरेंची मागणी

**आणि**

- राज्यभरात रमजान ईदचा उत्साह

**<><><><><>**

सोमवारपासून व्यावसायिक ग्राहकांसाठी आणखी २० टक्के एलपीजी द्यायची तयारी केंद्र सरकारनं दाखवली आहे. त्यामुळं राज्यांना त्यांच्या मासिक सरासरीच्या एकूण ५० टक्के एलपीजी सोमवारपासून मिळेल. खासगी उपहारगृह, ढाबे, हॉटेल, कंपन्यांमधली उपहार गृह, राज्य सरकार किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे चालवली जाणारी भोजनगृह, अन्न प्रक्रीया आणि डेअरी उद्योगाला हा व्यावसायिक एलपीजी देताना प्राधान्य दिलं जाणार आहे. याशिवाय ५ किलोचे सिलिंडर घेणाऱ्यांनाही प्राधान्य द्यायचे निर्देश केंद्रीय पेट्रोलियम सचिवांना सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना लिहिलेल्या पत्रात दिले आहेत. या सर्वांना या एलपीजी पुरवठ्याचा लाभ घेण्यासाठी पेट्रोलियम कंपन्यांकडे नोंदणी करावी लागेल. तसंच पाइप गॅसची जोडणी घेण्यासाठी संबंधित कंपनीकडे अर्ज देऊन आवश्यक प्रक्रीया पूर्ण करावी लागेल. तरच त्यांना हा अतिरीक्त पुरवठ्यातला एलपीजी मिळेल.

**<><><><><>**

जगाशी स्पर्धा करण्यासाठी विद्यापीठांमधे आधुनिक आणि वैज्ञानिक दृष्टीकोन असणारा अभ्यासक्रम असणं गरजेचा आहे, असं प्रतिपादन उप राष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी केलं आहे. मुंबईत लोकभवन इथं रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या

पहिल्या दीक्षांत समारंभात आज ते बोलत होते. हार्ड स्किल आणि सॉफ्ट स्कील यांची सांगड घालणाऱ्यांना भविष्यात स्थान असेल असं त्यांनी अधोरेखित केलं. कुशल मनुष्यबळ निर्माण करून भारत स्वतःसह जगाला  आर्थिकदृष्ट्या सक्षम करत असल्याचं ते म्हणाले.

यावेळी उपराष्ट्रपतींनी वेगवेगळ्या विभागात प्रथम आलेल्या सहा विद्यार्थ्यांना सुवर्ण पदकं प्रदान  केली. तसंच राज्यातल्या युवांना कौशल्य प्रशिक्षण देणाऱ्या तीन औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा गौरव केला.

राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते.

<><><><><>

सकाळी उपराष्ट्रपतींनी नागपूरमध्ये भारतीय युवा संसदेच्या २९व्या राष्ट्रीय अधिवेशनाला संबोधित केलं. जग सध्या युद्धाच्या छायेत असून त्यावर केवळ संवादाच्या मार्गानेच तोडगा निघू शकतो असं ते यावेळी म्हणाले.

उद्या ते पुण्याजवळ उरळीकांचन इथल्या निसर्गोपचार आश्रमाच्या स्थापना दिन कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

<><><><><>

नाशिक पोलिसांनी आज अशोक खरात याची कसून चौकशी केली आहे.  या प्रकरणातील पीडित महिलांची ओळख सार्वजनिक होईल अशा प्रकारे वार्तांकन करून नये, अन्यथा कारवाई केली जाईल अशी सूचनाही विशेष तपास पथकानं केली आहे.

दरम्यान, आपल्यालाही अनेकांनी कॅप्टन खरात याची भेट घेण्याचा सल्ला दिला होता, मात्र आपण कधीच तिथे गेलो नसल्याचा खुलासा मंत्री छगन भुजबळ यांनी आज केला.

<><><><><>

राज्य सरकारने सर्वच भोंदूबाबांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली आहे. अशोक खरात प्रकरणाच्या संदर्भात ते मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. राज्यात अंधश्रद्धा आणि जादूटोणाविरोधी कायदा आहे, मात्र कायद्याचे रक्षकच अशा भोंदूबाबांचं समर्थन करत असतील तर कायदा कुचकामी ठरतो अशी टीका ठाकरे यांनी केली.

केवळ खरातची चौकशी न करता त्याला सहकार्य करणाऱ्या राजकीय नेत्यांचीही चौकशी करायला हवी. महाराष्ट्राला आधुनिक राज्य म्हणवून घ्यायचं असेल तर अशा भोंदूंच्या प्रभावापासून मुक्त करून घ्यावं लागेल असं ठाकरे यावेळी म्हणाले.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त स्थानीय लोकाधिकार समितीकडून युवांसाठी आयात-निर्यात लॉजिस्टिक्स प्रशिक्षण अभ्यासक्रमाला आजपासून सुरुवात झाली. मुंबईत शिवसेना भवनात उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत याचं उद्घाटन झालं. अशाचप्रकारचे वर्ग राज्यभरात सुरू करण्याचा मानस असल्याचं ठाकरे म्हणाले.

**<><><><><>**

ईद उल फित्र अर्थात रमजान ईद निमित्त आज राज्यात सर्वत्र नमाजपठण करण्यात आलं. राजधानी मुंबईसह गावोगावी मशिदी आणि ईदगाहमधे नमाज अदा करण्यासाठी गर्दी झाली होती. नागरिकांनी एकमेकांना शुभेच्छांसह भेटवस्तू आणि मिठाई देत ईदचा सण साजरा केला. स्थानिक लोकप्रतिनिधी आणि पोलीस तसंच प्रशासनातल्या अधिकाऱ्यांनी नमाजच्या ठिकाणी जाऊन सर्वांना शुभेच्छा दिल्या. राज्यभरातल्या उत्साहाविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

**- - -होल्ड व्हाइस कास्ट - - -**

***(नाशिकसह मालेगावमध्ये उत्साहात*** *रमजान ईद उत्साहात साजरी करण्यात आली.* ***मालेगावमध्ये सकाळीच*** *नमाजपठण करण्यात आलं.* ***धुळे*** *शहरातील पांझरा नदी काठच्या ईदगाह मैदान येथे मुस्लिम बांधवांनी एकत्र येत सामुहिक नमाज पठण करीत समाजाच्या ऐक्यासाठी जगाच्या शांतेसाठी आणि मानवी कल्याणासाठी दुवा मागितली.* ***अहिल्यानगर*** *शहरातील कोठला परिसरातील ईदगाह मैदानावर आज सकाळी 10 वाजता सामुदायिक नमाज अदा करण्यात आली.* ***बुलढाणा*** *जिल्ह्यातील खामगाव शहरांमध्ये सजनपुरी ईदगाह मैदानावर मुस्लिम समुदायानं नमाज अदा केली.* ***परभणी*** *शहरात रमजान ईद निमित्त शहरात महानगरपालिकेनं चार ठिकाणी सामूहिक नमाज अदा करण्याची सोय केली होती.* ***नांदेड****मध्ये ईदची मुख्य नमाज जुन्या नांदेडातील देगलूर नाका भागात असलेल्या ईदगाह मैदानावर अदा करण्यात आली. रमजान ईदनिमित्त* ***बीड*** *शहरातील ईदगाह मैदानावर नमाज*

*पठण झालं. **धाराशिव** शहरातही मुस्लिम समाजानं एकत्र येत सामूहिकरित्या नमाज अदा केली.)*

**<><><><><>**

भारत इनोव्हेटिव डीप टेक प्री समिटचं  आज आयआयटी मुंबईतल्या रिसर्च पार्क फाऊंडेशन इथं उद्घाटन झालं. केंद्र सरकारचे मुख्य वैज्ञानिक सल्लागार प्राध्यापक अजय कुमार सूद, उच्च शिक्षण विभागाचे सचिव डॉक्टर विनीत जोशी, विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे सचिव अभय करंदीकर यावेळी उपस्थित  होते. या दोन दिवसीय परिषदेत स्टार्टअप्स, गुंतवणूकदार, उद्योग जगतातील उच्चपदस्थ अधिकारी, धोरणकर्ते सहभागी झाले होते. ही परिषद या वर्षीच्या शेवटी फ्रान्समधे होणाऱ्या भारत इनोव्हेटीव २०२६ ची नांदी आहे.

**<><><><><>**

गुणात्मक दर्जेदार हळद पिकविणारा जिल्हा अशी हिंगोली जिल्ह्याची ओळख आहे. जिल्ह्यातल्या महिला बचत गटांनी विविध हळदीपासून अनेक उत्पादने तयार केली आहेत. त्यांचं ब्रँडिंग आणि आकर्षक पॅकेजिंग करुन देशभरात ती पोहोचवण्याचा निर्णय स्थानिक प्रशासनानं घेतला आहे. याविषयी जाणून घेऊया आमच्या वार्ताहरांकडून...

**- - - होल्ड व्हाइस कास्ट - - -**

*(विविध खाद्यपदार्थांसह साबण , तेल , हळद पावडर , हळद लोणचे , हळद क्रीम , रोगप्रतिकारक्षम शॉट्स , हळद तेल, हळद सिंदूर , हळदीचे बेणे अशी प्रक्रिया केलेली अनेक उत्पादने तयार केली आहेत. "हिंगोलीचे पिवळे सोने " हा ब्रँड तयार करून महिला बचत गटांच्या या उत्पादित वस्तू केंद्रासह राज्यातील लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांना भेट देण्यात येणार आहेत. त्यामुळे या वस्तूंची ब्रॅण्डिंग आणि दर्जा देशभरात पोहोचेल. या उपक्रमामुळे ग्रामीण महिलांना रोजगार निर्मितीची संधी मिळणार असून त्यातून आर्थिक दृष्ट्या सक्षम केले जाणार आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी रमेश कदम हिंगोली.)*

**<><><><><>**

ऑपरेशन शोध-३ या शोध मोहिमेअंतर्गत धुळे पोलिसांनी बेपत्ता झालेल्या १६५ महिला आणि १८ वर्षा खालील २२ मुली तसंच ३ अल्पवयीन मुले शोधली आहेत.  १५ दिवस ही मोहिम सुरू होती.

**<><><><><>**

चैत्री एकादशीच्या निमित्तानं येत्या २९ मार्च रोजी  श्री विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेण्यासाठी राज्यभरातून लाखो भाविक येणार आहेत. या वारीच्या पार्श्वभूमीवर २२ मार्च ते २ एप्रिलपर्यंत श्री विठ्ठल रुक्मिणीचे व्हीआयपी दर्शन बंद ठेवण्यात येणार आहे.

**<><><><><>**

प्रत्येक जिल्ह्यात सरकार उमेद मॉल उभारणार आहे. त्यानंतर बचतगट चळवळीला अधिक वेग येईल, असं प्रतिपादन सिंधुदुर्गचे पालकमंत्री नितेश राणे यांनी केलं.  कुडाळमध्ये सिंधुसरस आणि मिनी सरस प्रदर्शनच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. पाच दिवस चालणाऱ्या या प्रदर्शनात ७५ स्टॉल्स आहेत.

**<><><><><>**

राज्यघटनेला ७५ वर्षं होत असल्याच्या पार्श्वभूमीवर रत्नागिरी जिल्ह्यातल्या पाचही विधानसभा मतदारसंघांमध्ये प्रत्येकी एक याप्रमाणे पाच संविधान भवनं उभारली जाणार आहेत. याबाबतचा निर्णय पालकमंत्री डॉ. उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत आज घेण्यात आला. या संविधान भवनांमध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू केली जाईल.

**<><><><><>**

पुण्याजवळ वाघोलीत ६८ वी महाराष्ट्र केसरी आणि महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा सुरू आहेत. माती विभागात ५७ किलो वजनगटात कोल्हापूर जिल्ह्याचा मृणाल पाटील अव्वल आला तर पुणे शहराच्या ओंकार निगडे याला उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं. ७९ किलो आणि ८६ किलो गटात सोलापूर जिल्ह्याचे बिरुदेव बनसोडे आणि बच्या मशीद शेख यांनी प्रथम क्रमांक मिळवला. गादी विभागात ६१ किलो गटात कोल्हापूरचे वैभव पाटील आणि ८६ किलो गटात अभिषेक कापडे यांनी बाजी मारली. आज रात्री महाराष्ट्र केसरी किताबी लढतींची उपांत्यपूर्व फेरी पार पडणार आहे.

**<><><><><>**

राज्यात गेल्या २४ तासात विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. बुलढाण्यात ३७ पूर्णांक ५ अंश सेल्सियस कमाल तपमानाची नोंद झाली. येत्या २ दिवसात मध्य महाराष्ट्र,

मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**//<><><><><>//**